## भूमिहीन दारिद्रय रेषेखालील आदिवासींचे सबळीकरण व स्वाभिमान योजना

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग,
शासन निर्णय क्रमांक : भूवाये -२००३/प्र.क्र.१४२/का.९
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक : २४ फेब्रुवारी, २००४

**शासन निर्णय:-** अनुसूचित जमातीकरिता शैक्षणिक सुविधा राज्य शासनाने उपलब्ध केल्यामुळे त्यांच्यामध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढत आहे. सध्याच्या उदारीकरणाच्या धोरणानुळे नोक-या उपलब्ध होण्याचे प्रमाण कमी झालेले आहे. त्यामुळे सर्वसाधारण लोकांमध्ये आढळून येणारे सुशिक्षित बेरोजगारांचे प्रमाण अनुसूचित जमातीच्या लोकांमध्ये जास्त आढळते. ज्या आदिवासी कुटुंबांकडे कसण्याकरिता जमीन आहे त्यांना उत्पन्नाचे साधन उपलब्ध झालेले आहे. मात्र दारिद्रय रेषेखालील भूमिहिन कुटुंबांना उदरनिर्वाहाचे अन्य साधन नसल्याने त्यांना रोजगार हमी योजना किंवा खाजगी व्यक्तींकडे मजुरी करावी लागते. परिणामी, त्यांच्या राहणीमानावर प्रतिकुल परिणाम होतो. त्यांचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढावे व त्यांच्या राहणीमानात बदल व्हावा याकरिता त्यांचे मजूरीवर असलेले अवलंबित्व कमी होऊन त्यांना कायमस्वरुपी उत्पन्नाचे साधन उपलब्ध होणे आवश्यक आहे. याकरिता या विभागामार्फत दारिद्रय रेषेखालील आदिवासी भूमिहिन कुटुंबांना उत्पन्नाचे स्त्रोत उपलब्ध व्हावे म्हणून त्यांना कसण्याकरिता जमिन उपलब्ध करावयाची आहे. त्यासाठी ५०% अनुदान व ५० % कर्ज या स्वरुपात निधी उपलब्ध करुन देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे व या योजनाला प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. भूमिहिन आदिवासींना जी जमिन वाटप करावयाची आहे त्या जमिनीचे दर निश्चित करणे, खरेदी करणे तसेच लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | अपर आयुक्त, आदिवासी विकास (संबंधित) | सदस्य |
| ३ | मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद | सदस्य |
| ४ | प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ मर्या. | सदस्य |
| ५ | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | सदस्य सचिव |

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
शाखा -
आवक नं. -
1 MAR 2004
विशेष नोंद वही नं. -
कार्यविवरण नं.

३. भूमिहीन आदिवासींना उत्तम प्रतीची जमिन माफक दराने उपलब्ध व्हावी म्हणून जिल्हा प्रशासनाचे मुख्य असलेले जिल्हाधिकारी व पदसिध्द अपर आयुक्त, आदिवासी विकास यांची समितीचे "अध्यक्ष" म्हणून नेमणूक केलेली आहे याची नोंद घेणे आवश्यक आहे.

४. जिल्ह्यात ज्या ठिकाणी चांगल्या प्रतिची जमिन उपलब्ध आहे व त्या ठिकाणी जी दारिद्रय रेषेखालील आदिवासी भूमिहीन कुटुंबे मोठ्या प्रमाणात आहे त्यांचा शोध घ्यावा. प्रथम जमिन उपलब्धता निर्धारण करुन प्रचलित शासकीय आदेशानुसार दर निश्चित करुन खरेदीची प्रक्रिया पुर्ण करावी. जमिनीच्या उपलब्धतेनुसार लाभार्थ्यांची निवड करावी. जमिन उपलब्ध झालेल्या गावांच्या परिसरात राहणा-या सर्व दारिद्रय रेषेखालील भूमिहीन लाभार्थ्यांच्या नावाच्या चिठ्ठया टाकून जिल्हाधिका-यांच्या नियंत्रणाखालील समितीने लाभार्थ्यांची निवड करावी. प्राथम्यक्रम द्यावयाच्या वर्गासाठी वेगळ्या चिठ्ठया टाकून निवडीची प्रक्रिया पुर्ण करावी. निवड प्रक्रिया अत्यंत पारदर्शक असणे आवश्यक आहे. या प्रक्रियेकरिता लागणारी माहिती प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांनी संकलित करुन निवड समितीस उपलब्ध करुन द्यावी.

५. जिल्हाधिका-यांच्या नियंत्रणाखाली समितीने खरेदी केलेल्या जमिनीचे ठिकाण, जमिनीचे दर, जमिनीचे नकाशे, लाभार्थ्यांची यादी व ज्यांना जमिनीचे वाटप करावयाचे आहे त्यांच्याकडून घेतलेल्या करार नाम्याच्या प्रती व सर्व माहितीसह आयुक्त, आदिवासी विकास यांच्याकडे प्रस्ताव पाठवावा. आयुक्त, आदिवासी विकास यांनी प्रस्तावास अंतिम मान्यता देऊन रक्कम वितरित करुन लाभधारकांना जमिनीचा ताबा देण्याची व्यवस्था करावी.

६. सदरहू योजना पुढील अटी व शर्तीनुसार राबविली जाईल :-

१) दिनांक १.१.२००० या दिनांकास भूमिहिन असणारा आदिवासी लाभ घेण्यास पात्र समजण्यात यावा.

२) जिल्हाधिका-यांच्या नियंत्रणाखालील समितीकडून जमिन खरेदी केली जाईल व तिचे वाटप करुन भूमिहिन आदिवासी कुटुंबातील पती-पत्नीच्या नावे केले जाईल. मात्र विधवा व परित्यक्त्या स्त्रियांच्या बाबतीत जमिन त्यांच्या नावे केली जाईल.

३) प्रत्येक भूमिहिन कुटुंबाला ४ एकर कोरडवाहू जमीन किंवा २ एकर ओलिता खालील जमीन उपलब्ध करुन दिली जाईल.

४) लाभार्थ्यांना उपलब्ध करुन द्यावयाच्या जमिनीकरिता अदा करण्यात येणाऱ्या रकमेपैकी ५०% रक्कम बिनव्याजी कर्ज व ५० % रक्कम अनुदान या स्वरुपात असेल. यापैकी कर्जाचा भाग हा राष्ट्रीय अनुसूचित जमाती वित्त व विकास

महामंडळ, नवी दिल्ली या केंद्र शासनातंर्गत कार्य करणाऱ्या संस्थेकडून उपलब्ध करुन घेण्यात येईल.

५) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक हे सनियंत्रण ठेवतील आणि त्याचा अहवाल दर तीन महिन्यांनी शासनास सादर करतील.

६) लाभार्थ्यांचे किमान वय २५ व कमाल वय ६० इतके राहील.

७) निवडण्यात येणारा लाभार्थी हा दारिद्रय रेषेखालील भूमीहिन शेत मजूर असावा.

८) या योजनेकरिता निवडावयाच्या लाभार्थ्यांमध्ये खालील घटकांना प्राधान्य देण्यात यावे:-

अ) आदिम जमाती ( कातकरी, कोलाम व माडिया )
ब) परित्यक्ता स्त्रियां
क) विधवा स्त्रियां

९) महसूल व वन विभागाने गायरान व अतिरिक्त जमीनीचे वाटपे केले आहे त्या कुटुंबांना लाभ मिळणार नाही.

१०) खरेदी करण्यात येणारी जमीन ही पती-पत्नीच्या नावाने खरेदी करण्यात यावी. मात्र विधवा व परित्यक्त्या स्त्रियांच्याबाबतीत त्यांच्या नावानेच जमीन खरेदी करण्यात यावी.

११) ज्या आदिवासी व्यक्तीच्या विरुध्द जमिनीच्या अतिक्रमणाबाबतची प्रकरणे अतिक्रमण अधिनियमातंर्गत महसूल अधिकाऱ्यांकडे प्रलंबित आहेत त्यांना या योजनेचा लाभ देण्यात येऊ नये.

१२) लाभार्थी कुटुंबाला जमीन उपलब्ध करुन दिल्यानंतर ती अन्य कोणत्याही व्यक्तीला विक्रीद्वारे किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव हस्तांतरीत करता येणार नाही.

१३) लाभार्थी कुटुंबाला देण्यात येणारे कर्ज हे बिनव्याजी व १० वर्ष मुदतीकरिता असेल. तथापि, कर्जफेडीची सुरुवात कर्ज मंजूरीनंतर २ वर्षानंतर सुरु करण्यात यावी.

३. या योजनेकरिता रु. १,००,००,०००/- (रुपये एक कोटी ) एवढी रक्कम आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्या अधिनस्त ठेवण्यात येत आहे. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी या योजनेचा लाभ देण्याच्या या कार्यक्रमावरील नियंत्रण व जबाबदारी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांची राहील. ही रक्कम आहरित करुन व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ यांच्याकडे सुपूर्द करावी . सन २००३-०४ या वर्षात रु. १,००,००,०००/- (रुपये एक

कोटी) उपलब्ध होणार आहेत. त्यामध्येच अनुदान व कर्जाच्या रकमेचा समावेश आहे. कर्ज व अनुदान याचा हिशोब व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांनी ठेवावा.

८. भूमिहिन आदिवासींना वाटप केलेली जमीन त्यांना कोणत्याही परिस्थितीत विकता येणार नाही. त्यांनी विहित मुदतीत कर्जाची परतफेड करणे आवश्यक आहे. संबंधित लाभधारकाने जमीन स्वत: कसणे आवश्यक आहे. त्याबाबतचा करारनामा त्यांच्याकडून घेण्यात यावा.

९. ही योजना शासनाने आदिवासीमधील दुर्बल घटकांसाठी तयार केलेली महत्वाकांक्षी योजना असून, विभागीय आयुक्तांनी दर महिन्याला त्याचा आढावा घ्यावा व योजनेचे संनियंत्रण करावे.

१०. सदर योजना आदिवासी उपयोजना क्षेत्रातील १५ जिल्हयात राबविण्यात येईल. दरवर्षी या योजनेकरिता अंदाजे रु. १०,००,००,०००/- एवढा निधी उपलब्ध करण्यात येईल. ही योजना राबवितांना समूह योजना (Cluster approach) विचारात घेण्याचा प्रयत्न करावा. सन २००३-०४ या वर्षात अंमलबजावणीसाठी उपलब्ध कालावधी अल्प असल्यामुळे ठाणे, गडचिरोली, यवतमाळ, नाशिक, नंदूरबार व अमरावती या जिल्हयात योजना राबविण्यात यावी. या ६ जिल्हयात प्रत्येकी रु. १६,६६,०००/- एवढया रकमेचे वाटप करण्यात येत आहे.

११. राष्ट्रीय अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली यांचेमार्फत जमिनीसाठी जे कर्ज उपलब्ध होणार आहे त्याकरिता त्यांच्याशी पत्रव्यवहार चालू आहे. त्यांनी संमती दिल्यानंतर कर्जाची प्रकरणे व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांनी दिल्ली येथील राष्ट्रीय अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळाकडे पाठविण्याची व्यवस्था करावी. तोपर्यंत शासनाकडून जी रक्कम उपलब्ध होईल त्यामध्ये ५० % कर्जाची रक्कम व ५० % अनुदानाच्या रकमेचा समावेश राहील. त्यानुसार कार्यवाही व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ,मर्यादित नाशिक यांनी करावी.

१२. सदर योजना राबविण्याकरिता होणारा खर्च खालील लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा.

"मागणी क्र- टि-४- २२२५-अनुसचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण- पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-जनजाती क्षेत्र उपयोजना-०२-अनुसूचित जमातीचे

कल्याण-१०२-आर्थिक विकास- (११) -भूमिहिन आदिवासींना जमिनीचे वाटप- (११) (०१) राज्य योजनातर्गत योजना (२२२५-३५६५) दत्तमत"

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( स.नु. गावीत )
उप सचिव

प्रति,